जिल्हा परिषद फंड मॉनेटरिंग सिस्टीम (ZPFMS)
वित्तिय वर्ष २०२५-२६ अखेर करावयाचे कामकाज,
वित्तिय लेखांकन तसेच वित्तिय वर्ष २०२६-२७ च्या
कामाकाजाबाबत मार्गदर्शक सूचना

महाराष्ट्र शासन,
शासन परिपत्रक,क्रमांक -आयटी -२०१६ / ५९ /मातंक
ग्रामविकास विभाग, बांधकाम भवन,
२५ मर्झबान पथ,फोर्ट ,मुंबई ४००००१
दिनांक :- २८ मार्च,२०२६

संदर्भ :-

१. ग्रामविकास विभाग, शासन निर्णय, क्रमांक आयटी -२०१६ प्र.क्र.२९/मातंक, दिनांक १४ ऑक्टोबर,२०२०
२. शासन आदेश, समक्रमांक,दिनांक ०४ नोव्हेंबर,२०२०
३. ग्रामविकास विभाग,शासन निर्णय,क्रमांक आयटी-२०१६ प्र.क्र.५९/मातंक, दिनांक ०८ सप्टेंबर,२०२१
४. ग्रामविकास विभाग, शासन निर्णय,क्रमांक आयटी-२०१६ प्र.क्र.५९/ मातंक दि.४ जानेवारी,२०२२
५. वित्त विभाग, शासन निर्णय,क्रमांक संकीर्ण-२०२३/प्र.क्र.११०/२०२३ कोषा प्रशा-५ दिनांक १४ फेब्रुवारी,२०२४
६. ग्रामविकास विभागाचे पत्र क्रमांक बीजीटी-२०२४/प्र.क्र.८८ -वित्त-१ दिनांक १९ ऑगस्ट,२०२४
७. ग्रामविकास विभागाचे पत्र क्रमांक बीजीटी-२०२४/प्र.क्र. ८८ वित्त -१ दिनांक २१ ऑक्टोबर,२०२४
८. वित्त विभाग,शासन परिपत्रक,क्रमांक संकीर्ण -२०२६/प्र.क्र.०१/कोषा प्रशा -५/ दिनांक १३ मार्च,२०२६

प्रस्तावना :-

जिल्हा परिषद स्तरावरील निधीचे वितरण व संनियंत्रण करण्यासाठी तसेच सर्व जिल्हा परिषदांमध्ये एक सुत्रता राहावी यासाठी जिल्हा परिषद फंड मॉनिटरिंग सिस्टिम (ZPFMS) या प्रणालीचा वापर करण्याचा निर्णय ग्रामविकास विभाग,शासन निर्णय दिनांक १४ ऑक्टोबर,२०२० अन्वये घेण्यात आलेला आहे.

२. जिल्हा परिषदांचे सन २०२१-२०२२ पासून वार्षिक लेखे जिल्हा परिषद फंड मॉनिटरिंग सिस्टीम या प्रणालीतून तयार करण्यात येत आहेत.

जिल्हा परिषद फंड मॉनिटरिंग प्रणालीमधील वित्तिय वर्षाअखेर करावयाचे कामकाज आणि वित्तिय लेखांकन - कामकाज बाबत सूचना वित्तीय वर्षा अखेर देणे आवश्यक आहे. त्यानुसार, जिल्हा परिषद फंड मॉनिटरिंग प्रणालीमधील वित्तिय वर्ष २०२५-२६ अखेर करावयाचे कामकाजाबाबत खालील वित्तिय लेखांकन तसेच वित्तिय वर्ष २०२६-२७ च्या कामाकाजाबाबत मार्गदर्शक सूचना/ निर्देश निर्गमित करण्यात येत आहेत.

**शासन परिपत्रक :-**

जिल्हा परिषद फंड मॉनिटरिंग प्रणाली ही महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६८ मधील तरतूदी व कार्यपध्दती विचारात घेऊन प्रणाली विकसित केली आहे. सबब,सर्व जिल्हा परिषदांनी,वित्तिय वर्ष २०२५-२०२६ अखेर करावयाचे कामकाज व दिनांक ३१/०३/२०२६ रोजीचे वित्तिय लेखांकन हे महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम,१९६८ मधील तरतूदीनुसार करणे आवश्यक आहे.

**दिनांक ३१/०३/२०२६ रोजीच्या प्रदानाबाबत :-**

१ वित्त विभागाचे शासन परिपत्रक दिनांक १३ मार्च २०२६ अन्वये आभासी वैयक्तिक ठेव लेखा (Virtual Personal Deposit Accounts VPDA) लेखाच्या अनुषंगाने कोणत्याही सूचना निर्गमित केलेल्या नसल्याने,प्रचलित कार्यपध्दती नुसार कार्यवाही करावी. VPDA च्या अनुषंगाने युनिक आयडी नुसार नमूद केलेली कालमर्यादेमध्ये जिल्हा परिषदांनी रकमा खर्च कराव्यात.युनिक आयडी कालमर्यादा ही वित्त विभागाकडून देण्यात येते,त्यामुळे यासंदर्भातील मुदतवाढ मिळणेबाबत कोणतेही प्रस्ताव या विभागाकडे सादर करणेत येऊ नये.

**जिल्हा परिषद स्तर**

२ जिल्हा परिषद फंड मॉनिटरिंग प्रणाली लागु करताना बँक ऑफ महाराष्ट्र मध्ये स्वतंत्र खाते (वार्षिक लेख्याशी संबंधीत सर्व कॅशबुक ) उघडण्याबाबत कळविण्यात आलेले असून त्याद्वारे प्रदान करण्याबाबतच्या सूचना शासन निर्णय दिनांक १४.१०.२०२०अन्वये दिलेल्या आहेत.

२.१ सर्व जिल्हा परिषदांनी दिनांक ३१/०३/२०२६ रोजी रात्री ९.०० वाजे पर्यंत मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्या लॉगीन ने Final Released होतील अशी सर्व प्रदाने Maha Pay लॉगीन वरुन अदा करावीत.

२.२ तसेच जी देयके रात्री ९.००वाजेपर्यंत मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे लॉगीन मध्ये Final Released करीता आलेली नाहीत,तथापि ZPFMS प्रणाली मध्ये Online नोंदविलेली असतील अशी रात्री ९.०० नंतर दिनांक ३१/०३/२०२६ ची देयके (ZPFMS) प्रणालीमधून OFFLINE BILL CREATION पध्दतीने प्राप्त झालेली बँक ऑफ महाराष्ट्राच्या खात्यातून अदा करावीत.

२.३ सर्व जिल्हा परिषदांनी दिनांक ३१/०३/२०२६ रात्री ९.०० वाजेपर्यंतची जी प्रदाने Final Release केली आहेत.मात्र अशी प्रदाने, बँकेचे MahaPay कडून झाली नाहीत अशा प्रकरणी बँकेकडून खात्री करुन अशी प्रदाने अदा करावीत. एकच INVOICE किंवा एकच Demand चे ONLINE /OFFLINE

दुबार प्रदान होणार नाही.याची दक्षता घ्यावी, जर अशा प्रकरणी दुबार प्रदाने झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ही संबंधित जिल्हा परिषदेची राहील.

## ३. पंचायत समिती स्तर

३.१ सर्व पंचायत समितीचे दिनांक ३१/०३/२०२६ रोजी रात्री ९.०० वाजे पर्यंत गटविकास अधिकारी यांचे लॉगीन ने Final Release होतील अशी सर्व प्रदाने MahaPay लॉगीन वरुन अदा केली जातील.

३.२ तसेच जी देयके रात्री ९.०० वाजेपर्यंत गट विकास अधिकारी यांचे लॉगीन मध्ये Final Release करीता आलेली नाहीत पण ZPFMS प्रणालीमध्ये ONLINE नोंदवलिेली असतील अशी रात्री ९.००नंतरची दिनांक ३१/०३/२०२६ ची देयके ZPFMS प्रणालीमधून OFFLINE BILL CREATION पध्दतीने बँक ऑफ महाराष्ट्राच्या खात्यातून अदा करावीत.

३.३ सर्व पंचायत समित्यांनी दिनांक ३१/०३/२०२६ रात्री ९.०० वाजेपर्यतची जी प्रदाने Final Release केली आहेत. मात्र अशी प्रदाने,बॅकेचे MahaPay कडून झाली नाहीत अशा प्रकरणी बॅकेकडून खात्री करुन अशी प्रदाने अदा करावीत.एकच INVOICE किंवा एकच Demand चे ONLINE / OFFLINE दुबार प्रदान होणार नाही याची दक्षता घ्यावी,जर अशा प्रकरणी दुबार प्रदाने झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत पंचायत समितीची राहील.

## ४. वित्तिय वर्ष २०२५-२०२६ अखरेचे कामकाज /लेखांकन तसेच सन २०२६-२०२७ चे कामकाजा बाबत :-

४.१ बीम्स (BEAMS) प्रणालीमध्ये ३१ मार्च,२०२६ रोजी सादर केलेले MTR ४४ प्रमाणे प्राप्त रकमा नोंदी पुर्ण करणे/ लेखांकन करणे,त्यानुसारची प्रदाने त्याकरीता जिल्हा परिषद फंड मॉनिटरिंग प्रणाली मध्ये वार्षिक लेखा वित्तिय वर्ष २०२५-२६ अखेर पर्यंत सुरु ठेवली जाणार आहे.

४.२ ZPFMS प्रणालीचे वित्तिय वर्ष २०२६-२०२७ हे दिनांक ०१/०४/२०२६ रोजी नियमितपणे सुरु होईल. सन २०२६-२०२७ या वित्तिय वर्षातील जिल्हा परिषदांचे कामकाज संपुर्णपणे पंचायत समितीसह ऑनलाईन पध्दतीने सुरु राहणार आहे. त्याचप्रमाणे सर्व जिल्हा परिषदांनी लेखांकन नियमित ZPFMS प्रणालीमधूनच करावयाचे आहे.

४.३ ग्रामविकास विभाग शासन निर्णय दिनांक १४/१०/२०२० मध्ये नमूद केल्यानूसार, जिल्हा परिषद स्तरावरील कामाचे फोटो Geo - Tagging करणे बंधनकारक केले असल्याने त्यानुसार यापुढेही कामाचे Geo - Tagging करणे बंधनकारक राहील.

४.४ प्रदानार्थ अदाता / लाभार्थी बॅक तपशिल (Beneficiary) नोंदी ही जिल्हा परिषद स्तरावर खाते प्रमुख्य तसेच गटविकास अधिकारी यांचे स्तरावर नोंदणी व अप्रव्हुली करीता सुविधा देण्यात आलेली आहे. त्यानुसार एकदा अप्रव्हुल झालेले प्रदानार्थ अदाता लाभार्थी बॅक तपशिल (Beneficiary) यामध्ये बदल करणे उचित नाही. मात्र काही कारणास्तव,बॅकेचे अद्यावतीकरण झाल्याने,अथवा खातेप्रमुखांचे /गटविकास अधिकारी स्तरावर चुकीचे अप्रव्हुल केले गेले असल्यास बदल करण्यासाठी,खातेप्रमुखाचे स्वाक्षांकित पत्र उचित कारणांसह, व त्यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी /पंचायत समिती स्तरावर गटविकास अधिकारी यांनी यात बदल करणे उचित असल्याची खात्री झाल्यानंतरच सदर पत्र प्रतिस्वाक्षरी करुन,कार्यालयीन मोहर व शिक्का यासह मुख्य लेखा व वित्त अधिकारी /पंचायत समिती स्तरावर गटविकास अधिकारी यांचे कार्यालयीन अधिकृत ई-मेल वरुन ZPFMS प्रणालीचे हेप्लडेस्क वर

(Email Id-helpdesk@zpfms.com) ई-मेल करणे आवश्यक असून सदर प्रक्रिया केल्या नंतर दुरुस्ती केली जाईल.तसेच दुरुस्ती करणेपुर्वी हेल्पडेस्क यांनी आलेला ई-मेल अधिकृत असलेबाबत त्यांचे कडील जिल्हा समन्वयक यांचेकडून खात्री करुन घ्यावी व अशा बदलाची हिस्ट्री ZPFMS प्रणाली मध्ये उपलब्ध राहिल व भविष्यात याबाबतची माहिती शासनास हवी असेल किंवा शासन मागणी करेल तेव्हा बँक ऑफ महाराष्ट्र यांनी उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील.

उपरोक्त सूचना या मार्गदर्शनापर व कोणत्याही स्वरुपाची अनियमितता होऊ नये म्हणून देण्यात येत असून,प्रचलित नियम /वेळोवेळी निर्गमित शासन निर्णय /परिपत्रक/शासन आदेश/शासन पत्र, यातील सुचनांचे पालन /कार्यवाही करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(प्रशांत पाटील)
उप सचिव , महाराष्ट्र शासन

प्रतः-

१. उप सचिव (मातंक) बांधकाम भवन, ग्रामविकास विभाग, फोर्ट, मुंबई.
२. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नाशिक विभाग
३. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद (सर्व)
४. मुख्य लेखा वित्त अधिकारी जिल्हा परिषद (सर्व)
५. स्वीय सहाय्यक, प्रधान सचिव (ग्रामविकास व पंचायत राज) यांचे कार्यालय ग्रामविकास विभाग
६. अवर सचिव (वित्त-६) / माहिती व तंत्रज्ञान कक्ष, ग्रामविकास विभाग, बांधकाम भवन मुंबई.
७. गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व)
८. श्री राजेंद्र मधुकर डोंगरे, सहाय्यक लेखाधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर,
९. श्रीमती संजीवनी रुपेश घरत, कनिष्ठ लेखाधिकारी, जिल्हा परिषद रायगड
१०. श्री मंगेश सावळीराम जगताप, कनिष्ठ लेखाधिकारी, जिल्हा परिषद नाशिक
११. महाप्रबंधक, बँक ऑफ महाराष्ट्र लोकमंगल, १५०१ शिवाजीनगर, पुणे, ४११००५
१२. मुख्य कार्यकारी अधिकारी PRM कंपनी, पुणे,विकास विभाग मुंबई.
१३.निवड नस्ती (कार्यासन-मातंक),बांधकाम भवन ग्रामविकास विभाग,मुंबई